पिपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८. लेखा विभाग
क्रमांक:- लेखा/पेन्शन/२३/कावि/ 2032 /२०२२
दिनांक:- १९/९/२०२२

<u>विषय</u>:- सेवा निवृत्तीवेतन/मयत कर्मचा-यांची सेवानोंद पुस्तके जमा करणे बाबत..

<u>परिपत्रक</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील निवृत्ती वेतन धारक/कुटुंब निवृत्ती वेतनधारकांना सातवा वेतनआयोग लागू झाल्याने, तसेच १०,२०,३० वर्षाचा लाभ मंजूर झाल्याने, त्यानुषंगाने सुधारीत वेतननिश्चीती करणेकामी सेवानिवृत/मयत कर्मचा-याची सेवानोंद पुस्तके सर्व विभागांना देण्यात आली आहेत. सुधारीत वेतननिश्चीती करुन सदर आदेशाची सेवानोंद पुस्तकामध्ये नोंदी घेऊन सेवानोंद पुस्तके लेखा विभागाकडे जमा करणे आवश्यक होते. तथापी बहुतांशी विभागाने अदयाप सेवानोंद पुस्तके जमा केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे संबंधीत निवृत्तीवेतनधारकांची पुढील इतर कामकाज करणेकामी अडचणी येत आहेत.

तरी, या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुखांना कळविणेत येते की, आपल्या विभागा मधील सेवानिवृत्त/मयत कर्मचा-याची लेखा विभागाकडून घेतलेली सर्व सेवानोंद पुस्तके अदयाप जमा केली नाहीत अशी सेवानोंद पुस्तके सुधारीत वेतननिश्चीती आदेशाच्या नोंदीसह त्वरीत ७ दिवसांचे आत लेखा विभागात जमा करावीत, सेवानिवृत्त/मयत कर्मचा-यांची सेवानोंद पुस्तके विभागाकडे नाहीत. सर्व सेवानोंद पुस्तके लेखा विभागात जमा केली आहेत असा दाखला माहे सप्टेंबर २०२२ चे पगारबीलात देण्यात यावा.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८.

प्रत:- सर्व शाखाप्रमुख